**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
**PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102**
**Telegram : Edutech E-Mail : system@dte.org.in Website: http://www.dte.org.in**

अत्यंत महत्वाचे

क्रमांकः ११/तंशिसं/खरेदी/२००८-०९/११९६
दिनांकः- ६/१२/०८

प्रति,

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये,
शासकीय तंत्रनिकेतन.

विषयः- **सन २००८-०९ या वर्षात करावयाच्या खरेदीबाबत**

मा. प्रधान सचिवांनी राज्य व विभागीय स्तरावर झालेल्या आढावा बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार सन २००८-०९ करिता खरेदी करावयाच्या यंत्रसामुग्रीचे पुरवठा आदेश दिनांक ३१ डिसेंबर २००८ पूर्वी द्यावयाचे आहेत. याबाबतचे निर्देश संचालनालयाचे सुध्दा दिनांक ११ जून २००८ रोजी प्राचार्या सोबत घेतलेल्या बैठकी दरम्यान दिलेले असून दिनांक ३१ डिसेंबर २००८ च्या पूर्वी सर्व पुरवठा आदेश देण्याच्या दृष्टीने संचालनालयीन स्तरावर संस्थेची मागणी घेणे, निविदा मागविणे, तपासणी व पुरवठा आदेश देणे तसेच संस्था स्तरावरील करावयाच्या ख रेदीच्या यंत्रसामुग्रीच्या याद्यास मान्यता देणे इ. बाबी अग्रक्रमाने करण्यांत येत आहेत.

आपणांस या पत्राद्वारे असे निर्देश देण्यांत येत आहेत की, संस्था स्तरावरील करावयाच्या खरेदीचे पुरवठा आदेश **दिनांक ३१ डिसेंबर २००८** पूर्वी देण्याच्या दृष्टीने नियमाधीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच संचालनालयीन व संस्था स्तरावरील खरेदीच्या अनुषंगाने सर्व देयके कोषागार कार्यालयात **दिनांक १५ फेब्रुवारी २००९** पूर्वी सादर करावी. उपरोक्त दोन्ही तारखा / मुदती कटाक्षाने पाळण्यात येऊन संस्थेकरिता शासनाने दिलेले अनुदान संपूर्ण खर्ची पाडावे. ज्या संस्था अनुदान खर्ची पाडणार नाहीत त्या संस्थांच्या प्राचार्यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

( डॉ. सु. का. महाजन )
प्र. संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत, माहितीकरिता व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये, आपल्या अधिपत्याखालील शासकीय संस्थांना उपरोक्त निर्देश द्यावेत.

---

जा क्र तंशिविकापु/ससावि/२००८/८८५४

तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दिनांक : ०८/१२/२००८ 8 DEC 2008

प्रत : प्राचार्य, सर्व शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र, एच एम सी टी पदविका / पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था. यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रातील दिलेल्या सुचानांनुसार खरेदीची कार्यवाही करावी.

(गो पं चौधरी)
प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे